REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज संबंध

कु. नम्रता देविदास ढाळे
संशोधन विद्यार्थिनी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रस्तावना :-

पोर्तुगाल ही हिंदुस्थानाचा जलमार्गाचा शोध लावणारी पहिली युरोपियन सत्ता, तथापि पोर्तुगीजांच्या पूर्वी आरब प्रवासी आणि व्यापारी हिंदुस्थानात जलमार्गाने व खुष्कीच्या मार्गाने येत असत. आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून 7 मे 1498 या दिवशी मलबार च्या किनाऱ्यावर कालिकत शहराच्या उत्तरेस आठ महिलावर कपट नावाच्या खेड्याच्या किनाऱ्यावर पहिले पाऊल ठेवणारा वास्को-दि-गामा पोर्तुगीज खलाशी होता. हिंदुस्तानत होनाराया व्यापारात आघाडीवर पोर्तुगीझ होती. त्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर स्वतःचे बस्तान बसवण्यास सुरुवात केली. तथापि व्यापारातील अर्थकारण हा बरोबरच त्यांनी राजकारण व धर्मकारणात अधिक लक्ष द्यावया सुरुवात केल्याने त्यांची अर्थकारणात पीछेहाट झाली होते. त्यांनी प्रथम सर्व अर्थकारणच केले . जेव्हा हिंदुस्तानाच्या राज्याचे फळ परिपक्व झाले. तेव्हा त्यांनी राजकारणात हात घातला. चांगले संबंध राखण्यात शिवाजी महाराजांसमोर गंभीर अडचणी निर्माण झाल्या. तशा अडचणी पोर्तुगीजांचा संबंधी निर्माण झाल्याचे दिसून येत नाही. याचे कारण म्हणजे हे इंग्रजा इतके सामर्थ्यशाली नव्हते. हिंदुस्थान आपेक्षा आपल्या स्वतःच्या अंतर्गत प्रश्नात ते गुरफटले होते. मराठा संबंधाची सुरुवात शिवाजी महाराजांपासून झाली, हे जरी खरे असले तरी महाराजांचे वडील शहाजीराजे हे निजामशाही सरदार होते. तेव्हा त्यांच्या व पोर्तुगीजांचा संबंध आला होता. शहाजीराजे आदिलशाहीत गेल्यावर हा संबंध दृढ झाला. गोव्याच्या व्हिसेरे दो ब्राझ कास्तू व गहरनार आँटोनिया मेलू द कस्तू या दोघांशी शहाजीराजांचे पत्रव्यवहार होता. तो केवळ औपचारिक स्वरूपाचा होता. मराठी व पोर्तुगीज यांच्यामध्ये राजकीय पातळीवर संबंध निर्माण झाला. तो शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यावर पोर्तुगीजांची पहिली वसाहत गोव्यात स्थापन झाली. लवकरच त्यांनी दमण व दीव या बेटावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. उत्तर कोकणात चोलपासून दमन पर्यंत किनारपट्टीवर त्यांचे राज्य निर्माण झाले. शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यात काही मतभेदाचे मुद्दे निर्माण झाले होते ते पुढीलप्रमाणे :

## छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज संघर्षाची कारणे :-

सर जदुनाथ सरकार यांनी छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज संबंधात मतभेदांमुळे चार महत्त्वाचे मुद्दे नमूद केलेले आढळतात ते पुढील प्रमाणे :

1. अनेक वर्षापासून सागरावर आपले अस्तित्व आहे असे पोर्तुगीज मानत होते. गोव्याच्या पोर्तुगीजसरकार कडून परवाना घेतल्याशिवाय कोणतेही व्यापारी सहज तारक समुद्र व हिंदू महासागरात संचार करू शकत नव्हते, म्हणून सागरावर संचार करावयाचा झाल्यास मराठ्यांच्या जहाजानीही आपली अनुमती घ्यावी असे पोर्तुगीजांचे मत होते, परंतु मराठ्यांना ही भूमिका अजिबात पसंत नव्हती.



2. शिवाजी महाराजनी ही रत्नागिरी किल्ल्यातील देसायाचा पराभव केला. या पराभूत देसायांनी पोर्तुगीज प्रदेशाचा आश्रय घेतला. आणि तिथून तो शिवाजी महाराजच्या सैन्यात वर छुपे हल्ले चढवू लागले. याघटनेमुळे शिवाजी महाराज असे अस्वस्थ झाले.

3. या पोर्तुगीज हेसुद्धा शिवाजी राजावर नाराज होते. कारण शिवाजीराजांवर नराज होते. करण अधिकारी कोकणात पोर्तुगिजांच्या व्यापारामध्ये अनेक अडथळे आणीत होते. याचा

पोर्तुगीजांना उपद्रव होत होता.

4. दमण राज्य पूर्वी कोळी राज्याच्यावर्चस्वाखाली होते. आता कोळी राजाचा पराभव आहे. केत्यानंतर हे राज्य शिवाजी महाराजच्या वर्चस्वाखाली आले. म्हणून शिवाजीने दमणच्या राज्यातूनही चौथाई वसुलीचा प्रारंभ केला. यामुळे पोर्तुगीज दुखावले गेले.

## शिवाजीच्या आरमाराची पोर्तुगिजांना धास्ती :-

सन 1658-59 च्या सुमारास शिवाजी महाराजांनी आरमार बांधण्याचा कार्यक्रम हाती घेताच, सर्वप्रथम पोर्तुगीजांनी त्यांची दखल घेतली. ते म्हणतात," शिवाजीने काही लढाऊ गलबते भिवंडी कल्याण पनवेल या वसईत तालुक्यातील बंदरात बांधले आहेत. यामुळे आम्हाला सावध राहणे भाग झाले आहे. आम्ही आमच्या कॅप्टनला आज्ञा केली आहे की, त्याने सदर गलबते बंदरातून बाहेर येऊनच देऊ नयेत. विशेष म्हणजे जहाजे बांधण्यासाठी शिवाजी महाराजांनी काही पोर्तुगीज कारागीर नेमले होते." शिवाजी महाराजांनीही बांधावयाचे काम 'रुई लेताव यां द व्हियागाश' च्याकडे सोपवली होती. वसईच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी आपल्याकडे काम करणाऱ्या पोर्तुगीज कारागिरांना चिथावणी दिल्याने ते आपणास न सांगता मुंबईस पळून गेले. हे शिवाजी महाराजांना कळले. या घटनेत मुळे पोर्तुगीजांच विषयी शिवाजी महाराजांच्या मनात प्रतिकूल ग्रह निर्माण झाला. म्हणून पोर्तुगीजांच्या मनापासून इच्छा होती. परंतु, मराठ्यांचे आरमार दिवसेदिवस मोठे होत गेले. 1667 गोव्याचा व्हाईसरॉय आपल्या पोर्तुगालचा राज्याला लिहितो. शिवाजीचे नौदल ही मला भीतीदायक वाटते. कारण त्याच्या विरुद्ध आम्ही सुरुवातीस कारवाई न केल्यामुळे त्याने किनाऱ्यावर किल्ले बांधले. आणि राज्य त्याच्याजवळ पुष्कळ तारावे आहेत.

## शिवाजी व पोर्तुगीज संघर्ष (सन 1656):-

कारवर किनार वरिल बद्रुरराजयचे बसनूर हे शहर शिवाजी महाराजांनी आरमारी मोहीम काढून लुटून घेतले. या मोहिमेवरून महाराजांचे आरमार परत येत, असताना पोर्तुगीज आरमार अशी त्यांची चकमक झाली. गोव्याच्या व्हाइसरॉयचा पुत्र 'दिनीज' पोर्तुगीज आरमाराचा प्रमुख अधिकारी होता. मुरगाव जवळ उभय पक्षांची सागरी लढाई घडून येऊन पोर्तुगीजांनी मराठ्यांची 13 तारवे कैद केल्याचा उल्लेख आढळतो. पुढे महाराज व पोर्तुगीज यांचा पत्रव्यवहार होऊन पोर्तुगीजही तारवे महाराजांना परत केली.

## शिवाजी महाराज विरुद्ध पोर्तुगीज सिद्धी युती:-

सन 1659 मध्ये शिवाजी महाराजांनी सिद्धी लष्करी मोहीम काढली होती. शिवाजी महाराजांनी ला करण्याकरिता पोर्तुगीजांच्या सहकार्याची आवश्यकता होती. आणि शिवाजीने महाराजांनी पोर्तुगिजांना तशी विनंतीही केली होती. मात्र पोर्तुगिजांच्या चौल वसई येथील अधिकाऱ्यांनी सिद्धी अन्नधान्याची रसद पाठवून साहाय्य केले. त्याविरुद्ध सिद्धीस गुप्तपणे साहाय्य करावे. असे पोर्तुगीज व्हाइसरॉयने ठरविले. शिवाजी महाराजांनी दुर्बल होणे. पोर्तुगीजांच्या हिताचे होते. म्हणूनच पोर्तुगीजांनी सिद्दीला मदत करणे पसंत केले. अशाप्रकारे मराठा विरुद्ध पोर्तुगीज सिद्धी यांची युती घडून आली. 1667 मध्ये शिवाजी महाराजांनी जंजिरा वेढा दिला. खुश्कीचा मार्ग व जलमार्ग वेडा बसून जंजिरा जर झाला. पोर्तुगीजांनाही बातमी समजली की सिद्धी शरणागती पत्करून जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात जावयास तयार झाला आहे असे झाले. तर पोर्तुगिजांच्या चोर प्रांतात मराठ्यांचा मोठा धक्का उत्पन्न होईल, असे पर्तुगिजांना वाटून त्यांनी सिद्धी दारूगोळा गुप्तरितीने पोहोचून सर्व मदत करू लागला. पुढे खांदेरीवर शिवाजी महाराजांनी उभारण्याचे काम हाती घेतल्याची बातमी समजली. तेव्हा इंग्रजा प्रमाणे पोर्तुगीजांनाही त्यांची भीती वाटू लागली. बांधण्याच्या कामात आपण अडथळा आणायला याचा असे त्यांनी ठरवले. परंतु, या कामात मुंबईकर इंग्रजांनी पुढाकार घेतल्याचे समजल्यावर पोर्तुगीज शहाणपणाने तटस्थ राहिले. खांदेरीच्या लढाईचं आपणास साहाय्य करावे. अशी विनंती इंग्रजांनी केल्यावर आपला शिवाजी महाराजांशी मैत्रीचा तह झाल्याचे निमित्त पुढे करून पोर्तुगीजांनी आपले अंग खांदेरी प्रकरणातून काढून घेतले. तरीही आपण धान्य वगैरे रसद तुम्हास देऊ असे, इंग्रजास त्याने अभिवचन दिले. त्यानुसार पोर्तुगीज आणि इंग्रजास मदतही केली असावे असे वाटते. कारण खांदेरीवर मराठ्यांचे तटबंदी झाल्यास त्यांच्या वसईच्या प्रांतात धोका उत्पन्न होणार होता.

### पोर्तुगीजांचा देसाईयांना आश्रय:-

सन 1664 शिवाजी महाराजांनी विजापूरी सरदार खवासखानाचा पराभव केल्यानंतर त्यांनी गोव्याच्या आसपासचा मुलुख लुटतखवासखान अशी झालेल्या लढाईत लखम सावंत, केशव नाईक, केशव प्रभू , खळू शेनवी इत्यादी देसाई खानाच्या बाजूने लढले व पराभूत होऊन गेले. इतिहास संशोधक डॉक्टर पांडुरंग पिर्सुलेकर म्हानतात, 'हे कोकणातील देसाई गोव्यातून शिवाजीच्या प्रदेशात जाऊन अधिकाऱ्यांची फुस होती'.

### पोर्तुगीजांचे मराठ्यांच्या शत्रु संबंधीचे धोरण:-

आदिलशहा व मोगल हे मराठ्यांचे दोन मुख्य शत्रू होते. गोव्याकडील बाजूस पोर्तुगीजांचा आदिलशहाशी वसई,चोल कडील बाजूस मोगला शी संबंध येईल. या दोन मुसलमानी सत्ता पैकी पोर्तुगीजांची सहानुभूती आदिलशहाच्या बाजूने होती. मराठा आदिलशाहीशी संघर्ष आदिलशहास गुप्तपणे मदत करत उदाहरणार्थ शिवाजीमहाराजांनी सुरतेच्या लुटीहूंण येत असताना उत्तरेकडील पोर्तुगीज प्रदेशा जवळून प्रवास केला, असे सांगतात. याचे कारण संकट आल्यास त्या प्रदेशात आश्रय घेता यावा. असा आश्रय पोर्तुगीज निश्चित दिला असता. मोगलांना पोर्तुगीजांची महाराजा बद्दलची ही सहानभूती लक्षात येताच त्यांनी वसई प्रांतावर हल्ला करून पोर्तुगीजांना शिक्षा करण्याचा प्रयत्न केला. सन 1666 शिवाजी महाराजांनी आदिलशहाच्या ताब्यात असणाऱ्या फोंडा किल्ल्यास वेढा घातला. तेव्हा तो किल्ला जेर होऊन शरण येणार अशी परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा पोर्तुगीजांनी फोंड्याच्या किल्लेदारास दारुगोळ्याची मदत गुप्तपणे धाडली. डॉक्टर पिसुर्लेकर म्हणतात इतकेच नव्हे तर, विजापूरकरांच्या पक्षाचे गोव्यात राहणारे कोकणचे देसाई सदर किल्ला लढविण्यासाठी फोंड्या जाण्यास तयार होते. त्यांना गुप्तपणे पोहोचवण्याची व्यवस्था त्यांनी केली. फोंड्याचा किल्ला आठवडा देखील लढवणे विजापूरकरास कठीण होते. पण पोर्तुगीजांच्या मदतीने तो किल्ला विजापूरकरांकडून 'रुस्तुम जमान' मदतीस येईपर्यंत लढला. पुढे रुस्तुम ने घाटाखाली येऊन फोंड्याचा वेढा उठवला.

### शिवाजीराजा पोर्तुगीजावर स्वारी (1667) :-

वारंवार सूचना देऊनही देसायांनी शिवाजींच्या मुलखातील दंगेधोपे थांबवले नाहीत. त्यावेळी शिवाजीला त्यांचा बंदोबस्त करणे भाग होते. दोन कारणामुळे शिवाजींनी गोव्यावरील ही स्वारी आवश्यक होऊन बसली होती. त्यापैकी पहिले कारण म्हणजे बार्देश प्रदेशातील पोर्तुगीज धर्म प्रदेश मोठ्या प्रमाणात हिंदू चे धर्मांतर चालवले होते. बारदेशामध्ये 700 हिंदू होते. त्यापैकी 4000 हिंदू ना क्रिश्चन बनवण्यात आले होते. ही दोन कारणे अतिशय गंभीर होती. म्हणून शिवाजीने 19 नोव्हेंबर 1667 रोजी बारदेश वर स्वारी केली. तीन दिवस. बारदेशाचा मोठ्या प्रमाणात लूट करण्यात आली. आपले सामर्थ्य दर्शविण्याचा शिवाजी महाराजांचा यात उद्देश होता. या स्वारीत शिवाजीमहाराजांनी 1600 पोर्तुगिजांना युद्धकैदी म्हणून पकडून नेले.

### शिवाजी महाराज पोर्तुगीज तह (1667):-

बारदेशाच्या स्वारीनंतर मराठे व पोर्तुगिज यांच्यात सलोख्याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. मराठ्यांचे मित्र डच हे आदिलशहाला मिळणार ही बातमी शिवाजी महाराज कळल्यावर त्याने विशेष आढेवेढे न घेता पोर्तुगीजांशी केला असे व्हाईसराय म्हणतो. परंतु त्यात तथ्य दिसत नाही. महाराजांना निष्कारण शत्रू नको होते. त्यांच्या गैरकृत्यबद्दलअद्दल घडविणे एवढेच त्यांच्या स्वारीचे उद्दिष्ट होते. ते सफल झाल्यावर महाराज तहास तयार झाले असावेत. दिनांक 5 डिसेंबर 1667 रोजी शिवाजी व पोर्तुगीज यांच्यात मैत्रीचा तह घडून आला. त्या तहातील तरतुदी पुढील प्रमाणे:

1. दिनांक 19 नोव्हेंबर 1667 रोजी शिवाजीराजांच्या सैन्याने मध्ये शिरून जे पुरुष ,स्त्रिया आणि मुले युद्धकैदी म्हणून नेले. त्यांना शिवारी शिवाजीराजे यांनी आमच्याकडून कोणीच युद्ध खंडणी न घेता आम्हास परत करावे.
2. आमच्या राज्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या लखम सावंत व केशव नाईक यादे सा-यांना सक्त ताकीद देण्यात येईल की त्यांनी आमच्या राज्यात राहून शिवाजीराजे त्यांचे प्रजा आणि त्यांचे राज्य याविरुद्ध कोणतीच कारवाई करू नये. त्यांच्या हातून तसे कृत्य घडण्याची जाणीव झाल्यास अथवा शिवाजीराजांनी ते आमच्या निदर्शनास आणल्यास त्या देशायांना आमच्या स्वामीच्या राज्यातून ताबडतोब हाकलून देण्यात येईल. आमच्या स्वामी च्या राज्यात येऊन राहिलेले. दुसरे दोन शरणार्थी नारबा सावंत

आणि मालू से नवी यांनाही तशीच ताकीद दिली जाईल आणि सर्व प्रकारची अंदाधुंदी टाळण्यासाठी सदरहू देसाई जोपर्यंत आमच्या राज्यात असतील तोपर्यंत त्यांना गोवा बेटा बाहेर जाऊ दिले जाणार नाही.

3. बालाघाट आतून गोवा बेटात आणि बंदरात, बारदेश व साष्टी महालात आणि गुरे येथील ती अडविली जाऊ नयेत. व त्यांच्या वर्करला लादला जाऊ नये. त्याच प्रमाणे पोर्तुगालचा राज्याच्या या राज्यातून आणि बेटातून जो मालक बालाघाट आला जाईल. त्याची अडवणूक होऊ नये अथवा त्यांच्यावर कर लादला जाऊ नये.
4. उभय पक्षांची दृढ आणि चांगली मैत्री असावी समुद्रावर आणि जमिनीवर ही मैत्री टिकावे. आणि उभय पक्षात पैकीकोणा एकाकडून या आकाराचा भंग झाल्यास त्याने दुसरीकडे त्याच संबंधाने तक्रार करावी.आमच्याकडून आगळीक झाल्यास शिवाजी महाराजांनी आमच्याकडे तक्रार करावी आणि शिवाजीमहाराजांकडून आगळीक झाल्यास आमच्याकडून आगळीक झाल्यास शिवाजीमहाराजांनी आमच्याकडे तक्रार करावी. आणि शिवाजी महाराजांकडून मागणी झाल्यास आम्ही त्यांच्या पाशी तक्रार करावी.
5. जर शिवाजीराजांना पोर्तुगीज व्हाईसरॉय यांच्याशी एकादा महत्त्वाचा सौदा करायचा असेल, तर त्यांना विश्वासातीलव्यक्तीमार्फत त्या वाटाघाटी करता येतील.

### गोवा जिंकण्याची शिवाजी राजांची योजना:-

1668 मध्ये शेवटी पोर्तुगिजांवर स्वारी करून त्यांचे गोव्याचे राज्य जिंकण्याचे अशी महाराजांचीयोजना होती. परंतु पोर्तुगीजांनी आपल्या राज्याचा चांगला बंदोबस्त केल्यामुळे महाराजांची हीयोजना गोव्याचा हंगामी गव्हर्नर आपल्या 7जानेवारी 1669 च्या एका पत्रात म्हणतो यावृत्तास कारवार येथील इंग्रज वखारवाल्यांच्या पत्राची ही दुजोरा मिळतो. कारवारकर इंग्रज 16डिसेंबर 1668 च्या आपल्या बातमी पत्रात लिहितात," निरनिराळ्या सबबीवर शिवाजीने सुमारेचार-पाच लोक गोव्यात घुसून दिले होते. थोड्याच वेळात ही संख्या दुप्पट झाली असती. आणित्यानंतर एका रात्री त्यांनी एकदम उठाव केला असता, तर कोणत्याही दरवाजा ताब्यात घेऊनपोर्तुगिजांनी पुरेसे सैन्य रणांगणावर उभे करण्याचे पूर्वीच शिवाजींचे लोकात शिरून त्यांनी गोवाकाबीज केले असते. यात शंका नव्हती परंतु, शिवाजी गोव्यापर्यंत आल्यावर आपल्या कटउघडकीस आला आपले लोक पकडले गेले. आणि पोर्तुगीज लोकही सज्ज होऊन राहिले. हे पाहून पुढचा बेत बदलून त्या भागातील आपल्या किल्ल्याची तो पाहणी करू लागला. इकडील सर्व मुलकात सर्व ठिकाणी कडेकोट बंदोबस्त झाला. असून आपल्याला प्रवेश मिळणे शक्य नाही असे पाहून रायगडला काही जरूरीचे काम आहे, असा बहाणा करून आपले सैन्य घेऊन शिवाजी परत वळला"

### पोर्तुगीज मराठा तह (1670):-

1670 पोर्तुगीज व मराठी यांच्यामध्ये पुन्हा एकदा मैत्रीचा तह घडून आला. या करारामध्ये पुढील करणे उभय पक्षांनी मान्य केले;

1. पोर्तुगीजांकडे असलेली मराठी जहाजे व मराठ्यांकडे असलेली पोर्तुगीज जहाजे एकमेकास परत द्यावी.
2. समुद्रावर मोगली जहाजना पोर्तुगीज जशा सवलती देतात. अशा सवलती मराठी जहाजेना मिळाव्यात. मराठा जहाजना पोर्तुगीज परगाव परवान्याची आवश्यकता राहणार नाही.
3. गोव्याचा व्हाईसराय मराठा व सिद्दी यांच्यात भांडणात मध्यस्थी करून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करेल.
4. घाटावरचा प्रदेश व गोवा या दरम्यान होणाऱ्या पारास व्यापारास मराठा अधिकारी अडथळा करणार नाहीत.
5. पोर्तुगीज हादी शेजारी मराठे किल्ले बांधणार नाहीत.

### पोर्तुगीजांकडून चौथाई वसुलीचा प्रश्न:-

दमनजवळच्या रामनगरच्या कोळी राजा पोर्तुगीज चौथाई देत असत. त्याराजाने दमणच्या प्रदेशात लुटालूट करू नये, म्हणून हि एक प्रकारची खंडणीचा पोर्तुगीजांनी मान्य केली होती. पुढे सन 1676 साल शिवाजी महाराजांनी रामनगरचे राज्य जिंकून घेतल्यावर त्यांनी पोर्तुगीजांकडे चौथाई ची मागणी केली, तथापि त्यांनाही चौथाई ही महाराजांकडून द्यावयाची नव्हती. असे त्यांच्या एकंदर पत्रव्यवहार यावरून दिसते. महाराजांशी मैत्रीची भाषा वपत्रात वापरून चौथाई प्रकरण शक्य तेवढे टोलवत न्यायचे, असे पोर्तुगीजांचे धोरण होते.16 डिसेंबर 1677 च्या एका पत्रात व्हॉइसरा लिहितो, "आपला वकील पितांबर शेणवी याने मला एक खलिता

दिला. त्यावरून असे दिसते की माझी व्हॉइसरावच्या नावे आपण पत्रे पाठवली होती. पण कामामुळे त्यांच्याकडून उत्तर गेले नाही. याकरिता हा पत्रव्यवहार शोधून काढण्यात मी सांगितले असून त्यातील प्रश्नांची उत्तरे मी देणार आहे. चौथाई संबंधी माहिती मी दमणच्या कपातान कडून मागवत आहे. उत्तरादाखल मी असे सुचवतो कि, मी नजर नेमून देईल त्या आमच्या वकिलाशी बोलण्यासाठी आपण एक वकील पाठवावा म्हणजे चौथाई ज्या कराराप्रमाणे देण्यात येत होत्या. त्या कराराची कलमे तपासून प्रकरण निकालात काढता येईल. हे पत्र म्हणजे पोर्तुगीजांच्या वेळ काढून धोरणाच्या चांगला मसाला समजला पाहिजे. त्यानंतर शिवाजीराजांनी जिवाजी शेणवी व त्यांच्यामागून गणेश शेट्टी हे दोन वकील गोव्यात चौथाईच्या विषयाबद्दल पाठवले. परंतु पोर्तुगीजांनी त्यांना दाद दिली नाही. शेवटी पोर्तुगिजांनी विरुद्ध बळाचा वापर केल्याशिवाय ते वठणीवर येणार नाहीत, असे शिवाजीराजांना वाटतं त्यांनी गोव्यावरील स्वारीचा विचार चालला होता. एवढ्यात त्यांना मृत्यूने गाठले व त्यामुळे पोर्तुगीजांचे फावले.

**मूल्यमापन:-**

शिवाजी महाराज व पोर्तुगीज या दोघांमध्ये मोठे आणि प्रदीर्घ युद्ध झाले नाही. हे जरी खरे असले तरी त्यांच्या अंमलाखालील प्रदेश मुक्त करण्याचा त्यांचा बेत होता. त्यासाठी ते युद्धाची तयारी करीत होते. त्यांचा सुगावा लागल्याने त्यांनीही त्यांना तोंड देण्याची तयारी सुरू केली होती. तसेच आपले स्वतःचे अरमान निर्माण करण करून शिवाजीराजांनी पोर्तुगीजांना एक प्रकारे दिलेला दिसून येतो. शिवाजीच्या आरमार करण्याला प्रथम विरोध पोर्तुगीजांनी केला. कारण पण त्यांना माहित होते, कि शिवाजी महाराज जर आपले प्रबळ आरमार उभा केले. तर आपली सागरी सत्ता संपुष्टात येऊ शकते. आणि शिवाजीराजांना पण जमिनीबरोबर सागरातून व्यापार केला. तर आपल्या राज्यात अधिक आर्थिक फायदा होईल. व राज्याची आर्थिक सुबकता वाढेल. यासाठी त्यांना पोर्तुगिजांची सागरावरील मक्तेदारी नष्ट करायचा शिवाजी राजे प्रयत्न करीत असलेले दिसून येतात. आणि एकूण स्वराज्यद्रोही लोकांना पोर्तुगीजांनी दिलेला आश्रय व त्यांनी स्वराज्याच्या प्रदेशावर वेळोवेळी केलेले हल्ले यामुळे शिवाजी महाराजांच्या मनात पोर्तुगीज याविषयी द्वेष निर्माण झालेला दिसून येतो.

आपल्या पोर्तुगीज मराठा संबंध या ग्रंथात डॉ. पिर्सुलेकर शिवाजी पोर्तुगीज संबंधाचा आढावा घेताना असे म्हटले आहे की, शिवाजीचा डोळा शेवटी-शेवटी पोर्तुगीजांवर होताच. फोंडे घेतल्यानंतर गोवा घेणे. शिवाजीला फारसे कठीण नव्हते. एकाच वेळी मोगलांशी व पोर्तुगीजांशी युद्ध करणार मुत्सद्दी पण होता. या कारणामुळे शिवाजीने पोर्तुगीजांशी युद्ध टाळणे. पोर्तुगीजांचा द्वेष करी, असे वेंगुर्ला येथील डचांनी लिहिले आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. स. शं. देसाई, पोर्तुगीज मराठा संबंध, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1989.
2. पा. स. पिसुर्लेकर, पोर्तुगिज मराठे संबंध अर्थात पोर्तुगीज दप्तरातील मराठ्यांचा इतिहास
3. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर खंड तिसरा, आशिया विभाग (भाग 1 ते 5) (इ.स. 1663-1739) ए. बी. द. ब्रांगांस परेरा , अध्यक्ष- पुराणवस्तू संशोधन विभाग गोवा सरकार 1939 ते 40 (संपादक) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1968.
4. जदुनाथ सरकार- शिवाजी अंड हीस टाइम्स टाईम
5. डॉ. जयसिंगराव पवार, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर 2010
6. डॉ. कोलारकर, मराठ्यांचा इतिहास) (1600-1818), श्री मंगेश प्रकाशन ,नागपूर 2003.
7. मदन मार्डीकर, मराठ्यांचा इतिहास, विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद 1998.
8. डॉ. एस.एन. सेन, मराठ्यांच्या लष्करी व्यवस्था, अनुवाद- डॉ. सदाशिव शिवदे, डायमंड पब्लिकेशन ,पुणे 2011.
9. कृ.अ. केळुसकर, छत्रपती शिवाजी महाराज, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे, 1906.
10. अ.रा. कुलकर्णी, मराठी आणि महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2007.